INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.MH-659/13(N)
www.vmsindia.org

# शारीरिक शिक्षण महाविद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या बी.पी.एड. प्रशिक्षणार्थ्यांची सांस्कृतिक बुध्दीमत्ता — एक अभ्यास

**अरमरकर म.प्र.**

श्रीज्ञानेश महाविद्यालय, नवरंगाव ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर

**सारांश:** तंत्रज्ञान व वैज्ञानिक युगामुळे जग समोर जात आहेत ते सामाजिक असो की क्रीडाक्षेत्राशी व व्यावसायीक क्षेत्रात. आधुनिक युगामुळे व्यक्तिंसमोर अशा अनेक संधी निर्माण होत असते. त्याचप्रमाणे आधुनिक युगातील विद्यार्थ्यांचा विकास हा शिक्षणाव्द्रारे, क्रीडाव्द्रारे, सांस्कृतिक व कला इत्यादी व्द्रारा होत असते. या युगात प्रशिक्षण घेणाऱ्या बी.पी.एड. प्रशिक्षणार्थ्यांची सांस्कृतीक बुध्दीमत्ता किती आहे व ती समाजाच्या हितासाठी कितपर्यंत योग्य राहील याचे अध्ययन करण्याकरीता संशोधन कर्त्याने या विषयाची निवड केली होती. प्राप्त संशोधनातून माहीती पुढे प्रकाशित केलेली आहेत.

**प्रस्तावना :**

'विद्या परम दैवतम्'' तसेच विद्या व ज्ञानामुळेच मनुष्य शोभून दिसतो, असे बोलणे अयोग्य होणार नाही. कारण मनुष्याला ईश्वरांकडून मिळालेली देणगी ती म्हणजे बुध्दी होय. म्हणूनच पृथ्वीवरील सर्व प्राण्यांमध्ये मनुष्य हा प्राणी सर्वश्रेष्ठ ठरला आहे. बुध्दीच्या जोरावर मनुष्य हा चंद्रावर व मंगळ ग्रहावर गेलेला आहे. बुध्दीच्या आधारावर आज विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र, कारखाने, शेतीचे यंत्र, संगणक, व्यवस्थापन व शिक्षण इत्यादी क्षेत्रात अतुलनिय अशी कामगीरी केलेली आहेत.

शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या बाबींवर प्राध्यापकांच्या व्यक्तिमत्व वर्तन, अभिरूची, अभिवृत्ती, भावना व सांस्कृतिक कार्यक्रम यांचा विशेष प्रभाव पडतो. म्हणून प्रशिक्षणार्थी शिक्षक अध्ययन प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या इतर गुणविशेष समजून घेण्यासाठी सांस्कृतिक बुध्दीमत्तेचे महत्व आहे. जेव्हा प्राध्यापक वर्गात शिकवित असतात, तेव्हा त्यांनी संस्कृतिच्या प्रकाशात आपल्या स्वत:च्या तसेच विद्यार्थ्याच्या बुध्दीमत्ता समजून घ्यावयास हव्यात. त्यामुळे अध्ययन प्रक्रिया ही अधिक आनंददायी व सर्जनशिल बनेल.

## शिक्षण :

शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिला ज्ञान मिळत असते शिक्षणाव्द्रारे व्यक्तीचा मानसिक, बौध्दीक व सामाजिक विकास होत असतो. शिक्षणातून मिळणारे ज्ञान हे व्यक्तिला समाजात कसे वागायचे, जगायचे, राहायचे शिकवित असतात. ज्ञान हे माहितीचेच एक स्वरूप असून ज्ञानाची निर्मीती आणि प्रत्यक्ष संपादन याव्द्रारे ज्ञान संग्रहण होत असते. वर्तमान समाज हा ज्ञानधिष्ठीत समाज म्हणून ओळखला जात असून ज्ञान संवर्धन आणि प्रत्यक्ष ज्ञानाचा अधिकाधिक वापर हे या समाजाचे वैशिष्टय आहे.

## शारीरिक शिक्षण :

शारीरिक शिक्षण ही शिक्षणाचीच एक प्रक्रिया किंवा शाखा आहे. शारीरिक, मानसिक, सामाजिक, बौध्दीक, भावनिक, नैतिक, खेळ, संगित, नृत्य व कला यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या किंवा प्रशिक्षक शिक्षक व शिक्षिका यांचा शारीरिक शिक्षणाव्द्रारे सर्वागीण विकास होत असतो. शारीरिक शिक्षणात वेगवेगळया बाबी व माध्यम आहेत असे काही तज्ञांचे मत आहे किंवा प्रभावी साधन आहे. म्हणूनच राष्ट्रीय शैक्षणिक योजनेत शारीरिक शिक्षण व क्रीडा यांची व्याख्या करण्यात आली आहे. ''शारीरिक शिक्षण संपूर्ण शिक्षण प्रबंधाचे एक अभिन्न अंग आहे. याशिवाय शारीरिक प्रक्रियांच्या माध्यमातून त्यांची निवड शारीरिक, मानसिक, संवेगात्कम व सामाजिक सुदृढ नागरिक निर्माण करणे होय.''

## सांस्कृतिक बुध्दीमत्ता :

मनुष्याला मिळालेल्या बुध्दीच्या आधारे व्यक्तिचा विकास होत असतो आणि व्यक्तीचा विकास म्हणजेच समाजाचा विकास होय. प्रत्येक समाजाची विशिष्ट संस्कृती असते व त्या संस्कृतीमुळे समाजाचे वेगळेपणा टिकूण असतो. त्यामूळे त्या संस्कृतीची जोपासना करणे तीचे संवर्धन व नविन पिढीकडे प्रतिष्ठित व्यक्ती मानवाची रूची तसेच कलेची गरज भागविण्यासाठी संघटना स्थापन करून त्याव्द्रारे सांस्कृतीक कार्य करतात. संस्कृतिव्द्रारे व्यक्तिवर्तणावर प्रभाव होवून,

व्यक्तिमत्वाचा विकास होतो म्हणून समाजाला सांस्कृतिकतेची आवश्यकता असते.

स्वत:मधील कौशल्य विकसित करण्याकरीता व्यक्ती स्वत:हून शिकतो आणि स्वत:मध्ये आवश्यक ते बदल घडवितो. संस्काराची वैशिष्टये, स्थानांतरण, एकात्मता, मुल्यस्तर आणि उच्च अस्थिरता याचा प्रभाव व्यक्ती विकासावर होतो. संस्कृती हे मानव समाजाचे सर्वात महत्वाचे वैशिष्टये आहे. मानव समाज व मानवोत्तर प्राण्यांच्या समाजात ती झालेली नसते. संस्कृतीची वाढ व निर्मीती हे मानव समाजाचे प्रमुख वैशिष्टये होय. उच्च दर्जाची बुध्दीमत्ता, कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती व विशिष्ट शरीररचना इ. वैशिष्टयांमुळे मानवच संस्कार निर्माण करू शकला आणि संकलन करून तिचा विकास करू शकला.

## व्याख्या:

''सामाजिक बुध्दीमत्ता अशी क्षमता आहे, जी स्वत:ला समजण्याची क्षमता आणि जिथे सांस्कृतिक मतभेद उत्पन्न होतात त्याच स्थितीत उपयोगी सहयोगाची निर्मीती करण्याची क्षमता होय.''

"Cultural intelligence is an inevitable requirement, in a particular for those who enter a quite different culture." By : Earley and Any.

## संशोधनाची आवश्यकता:

संशोधनाच्या माध्यमाने अज्ञान असणारे ज्ञान समाजासमोर येत असते आणि त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी होत असतो. त्याचप्रमाणे सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तिंची बुध्दीमत्तेची माहिती संशोधनाव्द्रारे प्राप्त होत असते. प्रशिक्षणार्थी शिक्षक व शिक्षिका हेच समोरील काळात समाजाच्या हितासाठी सांस्कृतिक बुध्दीमत्तेचा उपयोग कसा करेल याबाबत माहिती प्राप्त होईल.

## संशोधनाचे महत्व:

प्रत्येक समाजाची कोणती ना कोणतीतरी सामुहिक जीवनपध्दती असते. भावी किंवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांमध्ये या विविध गटातील व्यक्ति असणे स्वाभाविक असल्यास तरीही बी.पी. एड्. विद्यार्थ्यांचा किंवा प्रशिक्षणार्थ्यांचा सांस्कृतिक बुध्दीमत्तेचा प्रभाव जाणून घेण्याकरीता या संशोधन विषयाचे महत्व आहे.

## संशोधन समस्या:

शारीरिक शिक्षण महाविद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या बी.पी.एड. प्रशिक्षणार्थ्यांची सांस्कृतिक बुध्दीमत्ता – एक अभ्यास' हा विषय संशोधनासाठी घेतला होता.

## संशोधनाची उद्‌दिष्टे:

१) बी.पी.एड्. पुरूष प्रशिक्षणार्थीचा सांस्कृतिक बुध्दीमत्तेचा अध्ययन करणे.

२) बी.पी.एड्. स्त्री प्रशिक्षणार्थीनीची सांस्कृतिक बुध्दीमत्तेचे अध्ययन करणे.

३) बी.पी.एड्. पुरूष व स्त्री प्रशिक्षणार्थ्यांचे सांस्कृतिक बुध्दीमत्तेची तुलना करणे.

## संशोधनाची सिमा:

१) या संशोधकार्यासाठी निवडण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचे व विद्यार्थीनींचे मानसिक, शारीरिक व भौगोलिक परिस्थितीवर नियंत्रण नव्हते.

२) या संशोधनासाठी निवडण्यात आलेले प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची दिनचर्या व आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण नव्हते.

## संशोधनाची परिसिमा:

१) या संशोधनाकरीता शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील पुरूष व स्त्री असे एकूण १०० प्रशिक्षणार्थी शिक्षक व शिक्षिकांची निवड करण्यात आली.

२) हे संशोधन फक्त नागपूर जिल्हातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयापर्यंत सिमीत होते.

## संशोधनाची परिकल्पना:

शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षण घेणाऱ्या बी.पी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांची सांस्कृतिक बुध्दीमत्ता सार्थक असू शकते.

## संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधन हे सर्वेक्षण संशोधनपध्द्ती होती. या संशोधनासाठी नागपूर जिल्हयातील तीन शारीरिक शिक्षण महाविद्यालयात १०० पुरूष व स्त्री बी.पी.एड्. प्रशिक्षणार्थी यांची निवड यादृच्छिक न्यायदर्श पध्दतीव्द्रारे करण्यात आली. प्रशिक्षणार्थी पुरूष व स्त्री यांचे वय सरासरी २३.४ इतके होते. या सर्वेक्षणाकरीता क्रिस्टीन कोह, सून ऑग व लीन वान डाईन (२००७) यांची निर्मीत प्रमाणित चाचणीचा उपयोग करण्यात आला आणि आणि प्राप्त आंकडयाचे सांख्यकीय विश्लेषन करण्यात आले.

## चाचणीचे प्रमाणीकरण व विश्वसनियता:

प्रस्तृत संशोधाकरीता उपयोगात आणलेली चाचणी प्रमाणीकरण करण्याकरीता शिक्षण क्षेत्रातील सहा तंज्ञ व्यक्तीकडून प्रमाणित करण्यात आली. तसेच चाचणीची विश्वसनदिता ही ४ = ०. ८५ आहे म्हणजेच प्रश्नावली सार्थक आहेत.

## सांख्यकिय विश्लेषन:


प्रस्तृत संशोधानाच्या विश्लेषनाकरीता मध्यमान, प्रमाण विचलन, $SE_1$, मध्यमान अंतर, प्रमाण तृटी, 'टि' रेशियो या पध्दतीने करण्यात आले. ही सांख्यकिय सोडवणूक सोपी व

अर्थपूर्ण करण्यासाठी सारणी व आलेख स्वरूपात मांडण्यात आली आहे.

### शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षण घेणाऱ्या बी.पी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांची सांस्कृतिक बुध्दीमत्ता दर्शविणारी सारणी

| सांस्कृतिक बुध्दीमत्ता | एकूण (N) | मध्यमान | प्रमाण विचलन | S E1 | मध्यमान अंतर | प्रमाण त्रुटी | 't' Value | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष | ७९ | २१.५७ | ६.३५ | १.१३ | २.१३ | १.३४ | १.५९ | सार्थक नाही |
| स्त्री | २१ | १९.४४ | ५.१७ | ०.७९ | | | | |

### शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षण घेणाऱ्या बी.पी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांचे सांस्कृतिक बुध्दीमत्तेचा मध्यमान दर्शविणारा आलेख




### विश्लेषण:

सांस्कृतीक बुध्दीमत्तेचा मापनाकरीता बी.पी.एड्. प्रशिक्षणार्थी (पुरूष) व परिक्षणार्थीनी (स्त्री) यांच्या फरकातील सार्थकता स्तर दर्शविला असता प्रशिक्षणार्थीनीपेक्षा प्रशिक्षणार्थींमध्ये सांस्कृतिक बुध्दीमत्ता जास्त असल्याचे आढळून आले. परंतू हा फरक सार्थक नाही आहे.

### निष्कर्ष:

प्रस्तुत संशोधनाकरीता 'शारीरिक शिक्षण महाविद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या बी.पी.एड. प्रशिक्षणार्थ्यांची सांस्कृतिक बुध्दीमत्ता – एक अभ्यास' हा विषय घेतला होता. या संशोधनाव्दारे असे आढळून आले की प्रशिक्षणार्थीनीपेक्षा प्रशिक्षणार्थींमध्ये सांस्कृतिक बुध्दीमत्ता अधिक दिसून आली. ज्यांचे 't' Value ही १.५९ आली असून प्रमाणित 't' Value पेक्षा कमी आहे. करीता मिळालेली t' Value ही सार्थक नाही आहे.

### सुचना व शिफारस:

१) ग्रामीण व शहरी भागातील प्रशिक्षणार्थी शिक्षक व शिक्षिकांचे सांस्कृतिक बुध्दीमत्तेचे तुलनात्मक अभ्यास करता येईल.

२) विभिन्न धर्मीय व जातीय विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक बुध्दीमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

३) कौटुंबिक परिस्थितीचा सांस्कृतिक बुध्दीमत्तेवर पडणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करता येईल.

४) अशा प्रकारचे संशोधन विभागीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय पातळीवर देखील केल्या जाऊ शकते.

५) अशा प्रकारचे संशोधन विविध खेळ खेळणारे खेळाडूंवर देखिल केल्या जाऊ शकते.

### संदर्भग्रंथ सूची:

१. **करंदीकर सुरेश,** 'शैक्षणिक मानसशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१.

२. **घोरमाडे के. यु.,** 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे' विद्या प्रकाशन, नागपूर, २००८.

३. **भांडारकर के. एस.,** 'प्रगत शैक्षणिक संख्याशास्त्र', नित्य नूतन प्रकाशन, पुणे, २००७.

४. **बालायन डॉ. देवेन्द्र,** 'शारीरिक शिक्षा' उपकार प्रकाशन, आग्रा, २०११.

५. **श्रीवास्तव ए. के.,** 'खेळाचे मानसशास्त्र' स्पोर्ट्स पब्लिकेशन, नई दिल्ली, २००४.

******